
# येशूने एका मनुष्याला बरे करुन त्याविषयी सांगण्यास घरी पाठवले

**प्रार्थना:** ''प्रिय प्रभू, तुझ्या विषयी इतरांना सहज सोप्या भाषेत समजून सांगण्यासाठी मुलांना व त्यांच्या शिक्षकांना या अभ्यासाच्या द्वारे कृपा करुन साहाय्य कर''.''


मुलांचे वय आणि सध्याच्या गरजा यांना अनुरूप असे शैक्षणिक कार्यक्रम निवडा.

शिक्षकांनी किंवा मोठया मुलाने अनेक भुतांनी पछाडलेल्या माणसाचा कथावृत्तांत लूक 8:26-39 मधून वाचावा किंवा आठवून सांगावा. यात येशूने त्या माणसाला कसे बरे केले आणि देवाने त्याच्यासाठी काय केले हे सांगण्याकरीता त्याला त्यांच्या कुटुंबियांकडे व मित्रांकडे पाठवले हे सांगितले आहे.



कथा वृत्तांत सांगून झाल्यावर पुढील प्रश्न विचारा. *(प्रत्येक प्रश्नापुढे उत्तर दिले आहे).*

- येशूला पाहिल्यावर भूतग्रस्त माणसाने काय केले? *(पाहा वचन 28)*
- आपले नाव सैन्य असल्याचे त्या माणसाने का सांगितले? *(वचन 30)*
- त्या माणसाला सोडल्यावर ती भुते कोठे गेली? *(वचन 33)*
- डुकरांचे काय झाले? *(वचन 33)*
- येशूने त्या माणसाची भुतांपासून सुटका केल्यावर त्याला कोठे पाठवावे? *(वचन 39)*
- येशूने भुतांपासून सुटका झालेल्या माणसाला काय सांगितले? *(वचन 39)*



**महत्वाची टीप:** लोकांना देवाविषयी शिकवण्याचा सर्वात उत्तम मार्ग म्हणजे येशूने तुमच्याकरीता काय केले हे त्यांना तुमच्या पद्धतीने सांगणे. तुम्ही त्यांना एखादी आनंदाची बातमी, जसे मोलवान रत्न सापडले, त्यांना कशी सांगाल तशाच पद्धतीने देवाने काय केले हे सांगितले पाहिजे.

येशूने एका माणसाची भुतांपासून सुटका करुन त्याला घरी पाठवले ह्या वृत्तांताचे **नाट्यीकरण करा.**

- उपासनेच्या प्रमुखाशी चर्चा करुन मुलांना नाटिका सादर करण्याची व्यवस्था करा. तुम्ही सर्व भूमिका केल्या पाहिजेत असे नाही.
- मुलांकडून नाटिकेची चांगली तयारी करुन घ्या. मोठया मुलांनी लहान मुलांची तयारी करुन घेण्यासाठी मदत करावी.
- मोठया मुलांनी किंवा प्रौढांनी **बरा झालेला माणूस, पत्नी व निवेदक** ह्या भूमिका कराव्यात. निवेदकाने वृत्तांताचा सारांश तयार करुन मुलांना संवाद पाठ करण्यास मदत करावी.

**कोणत्याही नाटिकेसाठी सर्व भूमिका करण्यास पुरेशी मुले नसतील तर शेजाऱ्यांच्या मुलांची मदत घ्या अन्यथा निवेदकाने वृत्तांतातील पात्राची भूमिका सांगून त्याचे संवाद वाचून दाखवावेत.**

- लहान मुलांनी **कुटुंबिय** व **मित्रमंडळी** ह्या भूमिका कराव्यात.

**निवेदकः** लूक 8:26-31 मधून वृत्तांत वाचा किंवा सांगा. आणि मग म्हणा, ''हा बरा झालेला माणूस काय म्हणतो ते ऐका''.

**बरा झालेला माणूस :** ''मित्रहो, नासरेथकर येशूने माझ्यासाठी केलेल्या महान गोष्टींविषयी तुम्हांला सांगण्यास मी आलो आहे!''

**कुटुंबिय व मित्रमंडळी :** धावत जाऊन त्या माणसाभोवती जमा व्हा आणि म्हणा, ''बघा बघा, हा तर बरा झालेला दिसतो!'' ''त्याचे कपडेही नीटनेटके आहेत!'' ''याचे बोलणेही व्यवस्थित आहे!'' ''हे सर्व कोणी केले?''

**पत्नीः** ''आहो, तुम्ही तर वेडेपिसे झाला होतात! तुम्ही कबरांमध्ये राहात होतात! स्वतःला मारुन होत होतात!''

**कुटुंबिय व मित्रमंडळी :** म्हणा, ''बाबा, काय झाले'' ''तुमच्यामध्ये अनेक भुते राहात होती म्हणून तुम्हांला सैन्य म्हणत होते ना!'' ''आम्हांला वाटले आत तुम्ही आम्हांला परत कधीच दिसणार नाही'' ''तुमची खूप खूप आठवण यायची!''

**बरा झालेला माणूसः** ''नासरेथकर येशूने येऊन भुतांना हाकलून दिले! ती भुते डुकरांच्या एका मोठया कळपात गेली. मग तो कळप कहयावरुन धावत गेला आणि सरोवरात पडून मेला''.

**पत्नीः** ''मला येशूला पहायचे आहे-भेटायचे आहे''.

**बरा झालेला माणूसः** ''त्याने माझ्यासाठी अद्‌भुत गोष्टी केल्या, मलाही त्याच्या मागे जायचे होते, पण त्याच्याविषयी तुम्हांला सांगण्यसाठी त्याने मला इकडे पाठवले. तो तुमच्यावर देखील प्रेम करतो''.

**निवेदकः** मदत करणाया प्रत्येकाचे आभार माना.

**प्रश्न :** मुलांनी हे नाट्यीकरण प्रौढांसमोर सादर केले असेल तर वर दिलेले प्रश्न त्यांनी मोठया माणसांनाही विचारावेत.

इतर लोकांना सांगता येतील अशा येशूने आमच्यासाठी केलेल्या गोष्टींची अन्य उदाहरणे देण्यास मुलांना सांगा.



वर्तमानपत्र वाचणाया माणसाचे एक साधे चित्र काढा. मुलांनाही ते काढण्यास सांगा.

उपासनेच्या वेळी मुलांनी हे चित्र मोठया माणसांना दाखवावे आणि आमच्याकडे सांगव्यासारखी एक चांगली बातमी आहे, भुते व मरण यासह सैतानाच्या सर्व बलांवर येशूने विजय मिळवला आहे हे या चित्रावरुन स्पष्ट होते असे स्पष्ट करा.

**पाठ करा.** रोम. 5:8

**कविताः** स्तोत्र 8:1-5 मधून तीन मुलांना एकेक किंवा दोन दोन वचने म्हणायला सांगा.

येशूच्या तारणाविषयी आपले कुटुंबिय व मित्रमंडळीला सांगणारी गाणी किंवा कविता मोठया मुलांना लिहिण्यास सांगा.

**प्रार्थनाः** ''प्रिय प्रभू, तू आमच्यावर प्रीती करुन आम्हांला सैतान व मृत्यू यापसून सोडवलेस याबद्दल तुझी स्तुती करतो. तुझ्याविषयी इतर मुलांना सोप्या भाषेत सांगता यावे यासाठी आम्हांला साहाय्य कर''.

Copyright 2004 © by Paul-Timothy. May be freely copied. Download from www.Paul-Timothy.net